Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 2 – 2025 Impact Factor: 7.665

JOURNAL OF EAST-WEST THOUGHT

UGC CARE I

# निवड वेतन श्रेणी प्रशिक्षणाविषयी प्राथमिक शिक्षकांच्या शैक्षणिक व प्रशासकीय दृष्टिकोनाचा सहसंबंधात्मक अभ्यास

**उत्तम धर्मा चव्हाण,** संशोधक विद्यार्थी, के. सी. ई. सोसायटीचे शिक्षणशास्त्र आणि शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालय, जळगाव

**डॉ. पंकजकुमार शांताराम नन्नवरे,** संशोधन मार्गदर्शक, सहयोगी प्राध्यापक, बी. पी. आर्ट्स, एस. एस. ए. सायन्स व के. के. सी. कॉमर्स महाविद्यालय, चाळीसगाव जि. जळगाव

**डॉ. स्वाती चव्हाण**, सह-मार्गदर्शक, सहाय्यक प्राध्यापक, के. सी. ई. सोसायटीचे शिक्षणशास्त्र आणि शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालय, जळगाव

**सारांश**

सन २०२५- २०२६ या शैक्षणिक वर्षात महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे यांच्यामार्फत ज्या शिक्षकांना १२ वर्षे व २४ वर्षे पूर्ण झालेली आहेत त्यांच्यासाठी अनुक्रमे वरिष्ठ वेतन श्रेणी, निवड वेतनश्रेणीचे प्रशिक्षण, प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक, व अध्यापक विद्यालयातील शिक्षकांसाठी २ जून २०२५ ते १२ जून २०२५ दहा दिवसाचे प्रशिक्षण आयोजित केलेले होते. सदर प्रशिक्षणामध्ये शैक्षणिक, प्रशासकीय, व इतर घटकांविषयी शिक्षकांचे प्रशिक्षण घेण्यात आले. सदर प्रशिक्षण हे केवळ वेतनश्रेणीसाठी नसून त्यातून शिक्षकांचा स्वविकास व सक्षमीकरण झाले का? या प्रशिक्षणा विषयी शिक्षकाचा दृष्टिकोन काय आहे हे जाणून घेण्याचे संशोधकाने ठरविले आहे.

**मुख्य संबोध:** निवड वेतन श्रेणी प्रशिक्षण, प्राथमिक शिक्षक, शैक्षणिक घटक, प्रशासकीय घटक,इतर घटक. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०, राज्य अभ्यासक्रम आराखडा २०२४, भारतीय ज्ञान प्रणाली, शालेय संस्कृती व शालेय प्रक्रिया, मूल्यमापनाच्या पद्धती, शैक्षणिक संशोधन, २१व्या शतकातील कौशल्य, शाळा मूल्यांकन, सेवा हमी कायदा, व्यवसाय शिक्षण

## प्रस्तावना

शिक्षक हा समाजाचा मुख्य आधारस्तंभ आहे. समाजामध्ये परिवर्तन घडवून आणण्यासाठी शिक्षक महत्त्वाची भूमिका बजावतो. शिक्षणक्षेत्रामध्ये विविध प्रकारचे बदल होत आहे. शिक्षकाची भूमिका केवळ अध्यापना साठी राहिली नसून त्याला मार्गदर्शक, सल्लागार, समुपदेशक ,पालक, सुरक्षितता राखणारा, अशा अनेक भूमिका शिक्षकांना बजा वाव्या लागत आहेत .शिक्षक समाजाचे भविष्य घडविणारा शिल्पकार असतो. बदलत्या काळानुसार शिक्षकांना स्वतःमध्ये व शिक्षणाच्या बाबतीत बदल घडवून आणणे अपरिहार्य झाले आहे. जुने टाकून देऊन प्रत्येक ठिकाणी नव्याचा वापर होत आहे. या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी दीर्घ कालावधीपासून सेवेत असलेल्यांना निवड श्रेणी प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. जागतिकीकरण, डिजिटल साक्षरता क्रांती, राष्ट्रीय शिक्षण धोरण, राज्य अभ्यासक्रम आराखडा, सामाजिक परिवर्तन यांच्या प्रभावामुळे शिक्षण क्षेत्रासमोर नित्य नवीन आव्हाने उभी राहत आहेत. या सर्व आव्हानांना समर्थपणे तोंड देण्यासाठी शिक्षकांना प्रशिक्षण देणे आवश्यक आहे.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

**समस्येची पार्श्वभूमी**

शिक्षकांसाठी निवड वेतन श्रेणीचे जे प्रशिक्षण आयोजित केले होते ते समाधानकारक होते का ? प्रशिक्षणाच्या शैक्षणिक,प्रशासकीय व इतर घटकांविषयी संपूर्ण ज्ञान प्राप्त झाले का? प्रशिक्षणाचे घटक हे शिक्षक व विद्यार्थ्यांच्या गरजा व सद्य परिस्थितीतील बदलांचा, नाविन्यपूर्ण घटकांचा विचार करून निवडण्यात आले का ? सदर प्रशिक्षणातून दैनंदिन कामाबाबत नक्कीच मार्गदर्शन व दिशा मिळाली आहे का ? प्रशासकीय व शैक्षणिक कामकाजाच्या दृष्टीने सदर प्रशिक्षण आवश्यक आहे का ? येणाऱ्या समस्या, अडचणी व त्यावरील उपाययोजनांची उत्तरे या प्रशिक्षणातून शिक्षकांना मिळाली आहे का ? तसेच काम करण्याची प्रेरणा व ऊर्जा या प्रशिक्षणातून मिळते का ? या सर्व प्रश्नांची उत्तरे जाणून घेण्याचा संशोधकाने प्रयत्न केलेला आहे. सदर प्रशिक्षणाविषयी शिक्षकांचा आवश्यक तो दृष्टिकोन काय आहे याचा अभ्यास करण्याचे संशोधकाने ठरविले आहे.

**समस्येची गरज व महत्त्व**

प्राथमिक शिक्षकांसाठी जे प्रशिक्षण राबविण्यात आले त्याबद्दल प्रशिक्षणार्थ्यांची मते काय आहे ? सदर प्रशिक्षणाचा उपयोग शाळास्तरावर शाळांचा गुणवत्ता पूर्ण विकास करण्यासाठी सदर प्रशिक्षणाचा उपयोग होत आहे किंवा नाही? प्रशिक्षणाचा उपयोग केवळ वेतन श्रेणीसाठी न करता त्यातील घटकांचा शाळास्तरावर व विद्यार्थ्यांसाठी होत आहे किंवा नाही ? या सर्वांचा विचार या प्रशिक्षणातून दिसून येतो किंवा नाही याचा विचार करणे आवश्यक आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० , राज्य अभ्यासक्रम २०२४ , यानुसार शालेय कामकाज करण्यास सक्षम झाले आहे किंवा नाही ? शाळांचा गुणवत्ता पूर्ण विकास होत असतो का ? अध्ययन अध्यापन प्रक्रिया , एकविसाव्या शतकासाठीची कौशल्ये व शालेय समस्या सोडवण्यासाठी , विद्यार्थ्यांच्या समग्र मूल्यमापनासाठी सदर प्रशिक्षणाचा उपयोग होणे गरजेचे आहे.

**निवड वेतन श्रेणी प्रशिक्षणातील शैक्षणिक दृष्टिकोनाविषयी घटक**

1. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० व अभ्यासक्रम आराखडा २०२४
2. भारतीय ज्ञान प्रणाली
3. मूल्यांची रुजवणूक, एकविसाव्या शतकातील कौशल्ये
4. शालेय संस्कृती व शालेय प्रक्रिया, शैक्षणिक संशोधन, शिक्षणाची ऑनलाईन स्त्रोत व सायबर सुरक्षा
5. शिक्षक स्वविकसनव सक्षमीकरण

**निवड वेतन श्रेणी प्रशासकीय घटक**

1. रजा नियमावली, सेवा हमी कायदा, माहितीचा अधिकार कायदा २००५, शालेय अभिलेखे व शासकीय योजना
2. शालेय स्तरावरील विविध समित्या
3. नेतृत्व विकास आणि प्रशासन
4. कार्यालयीन लेखन कौशल्य पत्र व्यवहार.
5. शाळा गुणवत्ता मूल्यांकन आणि आश्वासन आराखडा.

**संशोधनाचे शीर्षक:** निवड वेतन श्रेणी प्रशिक्षणाविषयी प्राथमिक शिक्षकांच्या शैक्षणिक व प्रशासकीय दृष्टिकोनाचा अभ्यास


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: 2168-2259 (online)
(https://jetjournal.us/)
Volume 15, Issue 2 – 2025



**कार्यात्मक व्याख्या**

1. प्राथमिक शिक्षक: इयत्ता पहिली ते आठवीच्या वर्गापर्यंत कार्यरत असलेले उपशिक्षक, पदवीधर शिक्षक, व मुख्याध्यापक
2. निवड वेतन श्रेणी प्रशिक्षण: शिक्षकांना सेवेत २४ वर्षे पूर्ण झाल्यानंतर जे प्रशिक्षण दिले जाते त्यांना निवड श्रेणी प्रशिक्षण असे म्हणतात.
3. शैक्षणिक दृष्टिकोन: प्रशिक्षणामध्ये शिक्षकांना नवीन शैक्षणिक धोरणे, अध्यापन पद्धती आराखडा याविषयीची माहितीबद्दलचा कल.
4. प्रशासकीय दृष्टिकोन: निवड वेतनश्रेणी प्रशिक्षणामध्ये शाळेच्या प्रशासकीय बाबी.
    a) आरटीई कायदा २००९, माहिती अधिकार कायदा २००५, तसेच
    b) सुरक्षितता कायदा याबद्दलची माहिती दिली जाते.त्याबाबतचा
    c) प्रशिक्षणार्थ्यांचा कल म्हणजे प्रशासकीय दृष्टिकोन होय.

**संशोधनाची उद्दिष्टे**

1. निवड वेतन श्रेणी प्रशिक्षण घटकांचा अभ्यास करणे.
2. निवड वेतन श्रेणी प्रशिक्षण शैक्षणिक दृष्टिकोनाचा बदलांचा अभ्यास करणे.
3. निवड वेतन श्रेणी प्रशिक्षणाचा प्रशासकीय दृष्टिकोनांचा अभ्यास करणे .
4. निवड वेतनश्रेणी प्रशिक्षणाचा शैक्षणिक दृष्टिकोन व प्रशासकीय दृष्टिकोन यांचा सहसंबंध अभ्यासणे.

**संशोधनाची गृहितके**

सदरील संशोधनाची गृहितके पुढीलप्रमाणे आहेत.

1. प्राथमिक शिक्षकांसाठी निवड वेतनश्रेणी प्रशिक्षणाचे आयोजन केले जाते.
2. प्राथमिक शिक्षकांना समृद्ध करण्यासाठी व वेतनश्रेणी देण्यासाठी निवड वेतनश्रेणी प्रशिक्षणाचे आयोजन केले जाते.

**संशोधनाची चले**

स्वाश्रयीचले: निवड वेतन श्रेणी प्रशिक्षण

आश्रयी चले: शैक्षणिक दृष्टिकोन व प्रशासकीय दृष्टिकोन

**परिकल्पना**

1. निवड वेतनश्रेणी प्रशिक्षणाचा शैक्षणिक दृष्टिकोनाचा शालेय कामकाजावर सकारात्मक परिणाम होतो .
2. निवड वेतन श्रेणी प्रशिक्षणाचा प्रशासकीय दृष्टिकोनांचा कामकाजावर सकारात्मक परिणाम होतो.
3. निवड वेतनश्रेणी प्रशिक्षणाचा शैक्षणिक दृष्टिकोन व प्रशासकीय दृष्टिकोन यांच्यामध्ये धन सहसंबंध आढळून येतो.

**गृहितके**

1. प्राथमिक शिक्षकांसाठी निवड वेतनश्रेणी प्रशिक्षणाचे आयोजन केले जाते.
2. प्राथमिक शिक्षकांना समृद्ध करण्यासाठी व वेतनश्रेणी देण्यासाठी निवड वेतनश्रेणी प्रशिक्षणाचे आयोजन केले जाते.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

**संशोधनाची कार्यपद्धती:** या संशोधनात प्रायोगिक पद्धतीचा वापर केलेला आहे.

**जनसंख्या:** जळगाव जिल्ह्यातील चाळीसगाव तालुक्यातील निवड वेतनश्रेणी प्रशिक्षण झालेल्या शिक्षकांची संशोधनासाठी जनसंख्या निश्चित करण्यात आली होती.

**नमुना निवड:** असंभाव्यता पद्धतीतील सहेतुक नमुना निवड पद्धतीने चाळीसगाव तालुक्यातील ५० शिक्षकांची निवड करण्यात आली होती. २५ शिक्षक नियंत्रित गटासाठी व २५ शिक्षक प्रायोगिक गटासाठी निवडण्यात आले होते.

**संशोधनाची साधने:** या संशोधनात निवड श्रेणी वेतन प्रशिक्षणाविषयी शैक्षणिक कामकाज दृष्टिकोन व प्रशासकीय कामकाज दृष्टिकोन अभ्यासण्यासाठी संशोधकाने स्वनिर्मित प्रश्नावली- चा वापर करण्यात आला. यात विविध प्रकारानुसार २० प्रश्नांचा समावेश करण्यात आला होता. शिक्षकांना होय, नाही,अनिश्चित या तीन पर्यायांचा वापर करून प्रतिसादाची नोंद करावयाची होती.

**सांख्यकीय साधने:** या संशोधनात संकलित माहितीचे विश्लेषण करण्यासाठी शेकडेवारी व सहसंबंध गुणांक या साधनाचा वापर केलेला आहे.

**व्याप्ती व मर्यादा:** सदर संशोधन चाळीसगाव तालुक्यातील सन २०२५ मध्ये निवड वेतन श्रेणी प्रशिक्षण झालेल्या प्राथमिक शिक्षकांसाठीच आहे.

**माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन:**

उद्दिष्टे – १ निवड वेतन श्रेणी प्रशिक्षण बदलांचा शैक्षणिक दृष्टिकोनाचा अभ्यास करणे.

परिकल्पना-१ निवड वेतनश्रेणी प्रशिक्षणाचा शालेय कामकाजावर सकारात्मक परिणाम होतो.

कोष्टक १.१

| क्र. | चल | नमुना शिक्षक संख्या | नियंत्रित गट शेकडा गुण | प्रायोगिक गट शेकडा गुण | दोन्ही गटांमधील शेकडा गुण फरक |
|---|---|---|---|---|---|
| १ | शैक्षणिक दृष्टिकोन | २५ | ३५ | ७९ | ४४ |

शिक्षकांनी निवड वेतन श्रेणीचे प्रशिक्षण घेतल्यानंतर त्यांचा शैक्षणिक दृष्टिकोन शेकडा गुणांक प्रायोगिक गटाचा ७९ टक्के, तर नियंत्रित गटाचा गुणांक ३५ टक्के आढळून आला. दोन्ही गटातील गुणांकांमध्ये ३९ इतका फरक आढळून आला. म्हणजेच प्रायोगिक गटामध्ये प्रशिक्षण घेतल्यानंतर शैक्षणिक दृष्टिकोन सकारात्मक आढळून आला.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

उद्दिष्टे-२  निवड वेतन श्रेणी प्रशिक्षणाचा प्रशासकीय दृष्टिकोनांचा अभ्यास करणे.

परिकल्पना -२ निवड वेतन श्रेणी प्रशिक्षणाचा प्रशिक्षकीय कामकाजावर सकारात्मक परिणाम होतो.

कोष्टक २.२

| अ.न. | चल | नमुना शिक्षक संख्या | नियंत्रित गट शेकडा गुण | प्रायोगिकगट शेकडा गुण | दोन्ही गटांमधील शेकडा गुण फरक |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्रशासकीय दृष्टिकोन | २५ | २८ | ६९ | ४१ |

शिक्षकांनी निवड वेतन श्रेणीचे प्रशिक्षण घेतल्यानंतर त्यांचा प्रशासकीय कामकाजाविषयी दृष्टिकोनाचा प्रायोगिक गटाचा शेकडा गुणांक ६९ टक्के आढळून आला. ,तर नियंत्रित गटाचा शेकडा गुणांक २८ टक्के आढळून आला. म्हणजेच प्रायोगिक गटामध्ये प्रशिक्षण घेतल्यानंतर  प्रशासकीय कामकाजाविषयीचा दृष्टिकोन हा सकारात्मक आढळून आला.

उद्दिष्टे -३  निवड वेतनश्रेणी प्रशिक्षणाचा शैक्षणिक दृष्टिकोन व  प्रशासकीय दृष्टिकोन यांचा सहसंबंध अभ्यासणे.

परिकल्पना -३ निवड वेतनश्रेणी प्रशिक्षणाच्या शैक्षणिक दृष्टिकोन व प्रशासकीय दृष्टिकोन यांच्यामध्ये धन सहसंबंध आढळून येतो.

कोष्टक २.३

| क्र. | चल | नमुना शिक्षक संख्या | पूर्व चाचणीचे गुण | उत्तर चाचणीचे गुण | दोन्ही चाचणीच्या गुणांमधील सहसंबंध |
|---|---|---|---|---|---|
| १ | शैक्षणिक दृष्टिकोन | २५ | १५२ | ३२४ | ०.५५ |
| २ | प्रशासकीय दृष्टिकोन | २५ | | | |

निवड वेतनश्रेणी प्रशिक्षणाच्या शैक्षणिक दृष्टिकोन व प्रशासकीय दृष्टिकोन यांचा सहसंबंध काढला असता तो ०.५५ एवढा आहे म्हणजेच दोन्ही चलामध्ये मध्यम प्रतीचा सहसंबंध आढळून येतो.

**निष्कर्ष**

1. सदर प्रशिक्षण शिक्षकांना त्यांच्या शैक्षणिक विकासासाठी गरजेचे वाटले.
2. सदर प्रशिक्षणाच्या बाबतीत विविध प्रशासकीय बाबी, कायदे, धोरणे, नियम यांची माहिती  शिक्षकांना मिळाली.म्हणजेच प्रशिक्षणाचा प्रशासकीय  दृष्टिकोन सकारात्मक  दिसून आला.
3. सदर प्रशिक्षणातून निवड वेतन श्रेणी प्रशिक्षण व त्याबद्दल शिक्षकांचा शैक्षणिक दृष्टिकोन सकारात्मक दिसून आला.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

**शिफारसी**

1. सदर प्रशिक्षण २४ वर्षे ऐवजी २०वर्षांनी सदर प्रशिक्षण शिक्षकांना दिले जावे.
2. सदर प्रशिक्षण शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच असावे.
3. सदर प्रशिक्षण ज्यांना दिले जाते ते सध्या किंवा भविष्यात मुख्याध्यापक होऊ
4. शकतात. त्यामुळे प्रशासकीय घटकांवर जास्त जोर दिला जावा.
5. सदर प्रशिक्षणात घेण्यात येणाऱ्या चाचणी,स्वाध्याय, प्रकल्प सोडवण्यासाठी जास्त कालावधी दिला जावा.
6. सदर प्रशिक्षणात शैक्षणिक घटकावर आधारित प्रात्यक्षिकावर जोर द्यावा.

**संदर्भ ग्रंथ**

1. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे (२०२५) वाचन साहित्य निवड वेतन श्रेणी प्रशिक्षण प्राथमिक स्तर.
2. महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन प्रशिक्षण परिषद ( विद्या परिषद ) पुणे -३० (२०११) द्वितीय आवृत्ती प्रशिक्षण अभ्यासक्रम व हस्तुपुस्तिका.
3. http://www.maa.ac.in


Copyright © | JET Network, All Rights Reserved